Beed | DAILY | MARATHI | Year-03 | Issue -311 | MONDAY DT.12 FEBRUARY 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

बीड | दैनिक | मराठी | वर्ष -०३ | अंक -३११ | सोमवार,दि.१२ फेब्रुवारी २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२१/८००७४ | । किंमत ३ रू | । पाने ४




दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# मनोज जरांगेंची प्रकृती खालावली

## उपोषणाचा आजचा तिसरा दिवस, उपचार घेण्यास नकार, आंतरवालीत मराठा बांधवाची मोठी गर्दी



जालना / प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्याची माहिती आहे. मराठा आरक्षणाबाबत सरकारने काढलेल्या अध्यादेशाची तात्काळ अंबलबजावणी करण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंतरवाली सराटीमध्ये अमरण उपोषण सुरू केले आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. गेल्या तीन दिवसांत त्यांनी पाण्याचा थेंब देखील घेतला नसल्याने आणि उपचार घेण्यास नकार दिल्याने कालपासून त्यांची तब्येत देखील खालावली आहे.

अमरण उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी मनोज जरांगे यांच्या आरोग्य तपासणीसाठी आलेल्या डॉक्टरांना जरांगेंनी उपचार न घेता माघारी पाठवले. कोणत्याही प्रकारचा उपचार घेणार नसल्याच्या निर्णयावर ते उपोषणाच्या दुसऱ्या दिवशीही ठाम होते. शनिवारी जरांगे सकाळपासून स्टेजवर झोपूनच होते. जिल्हा शल्यचिकित्सकांच्या आदेशाने अंबड उपजिल्हा रुग्णालयातून जरांगे यांची तपासणी करण्यासाठी डॉक्टर आले होते. मात्र, जरांगेंनी तपासणीसाठी नकार दिला व ते माघारी परतले. जरांगे शनिवारी सकाळपासून उपोषणस्थळी झोपूनच होते. तथापि, गोदापट्ट्यातील अनेक मराठा बांधव जरांगेंना पाठिंबा देण्यासाठी आंतरवालीत येत आहेत.

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांनी गेल्या महिन्यात थेट मुंबईत धडक दिली होती. मात्र, वाशीवरच त्यांचे आंदोलन थांबवत सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सगेसोयरेबाबत अध्यादेश काढला होता. सोबतच पंधरा दिवसांत या अध्यादेशाची अंमलबजावणी होण्याचं देखील आश्वासन देण्यात आले होते. मात्र, पंधरा दिवस उलटून गेल्यावर देखील या अध्यादेशाची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उगारले.

### आंतरवालीत पुन्हा गर्दी

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी आंतरवाली सराटीमध्ये चौथ्यांदा उपोषण सुरू केले आहे. यापूर्वी त्यांच्या याच उपोषणास्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळायची. दरम्यान, मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा उपोषण सुरू केल्याने आंतरवालीमध्ये पुन्हा एकदा गर्दी होतांना पाहायला मिळत आहे. जालना जिल्ह्यासह मराठवाड्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील मराठा आंदोलक जरांगे यांची भेट घेण्यासाठी येत आहे. मात्र, कालपासून त्यांची प्रकृती खालावल्याने ते कोणासोबत ही बोलत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.




## शहरांमध्ये जोरजोराने सायलेन्सरचा आवाज करणारे

# बुलेट चालकावर कारवाई

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा ट्रॅफिक दलाने बीड शहरांमध्ये जोरजोराने सायलेन्सर चा आवाज करणारे बुलेट चालकावर कारवाई करून ४० बुलेट चे सायलेन्सर काढून घेण्यात आले, जप्त करण्यात आले. ही कारवाई अशाच प्रकारे पुढेही चालू ठेवण्यात येणार आहे. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ट्रॅफिकचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप आणि अंमलदार शेख उस्मान नितीन शिंदे, संतोष हंगे , नारायण वाघमारे, शिवदास घोलप , आणि महारुद्र डोईफोडे यांनी केली आहे.

# नगर परिषद उठली माजलगाव करांच्या मुळावर

## अशुद्ध पाणी पुरवठा केल्याने नागरीक झाले त्रस्त

माजलगांव ।प्रतिनिधी

शहरातील इंदिरा नगर भागात माजलगांव नगर परिषद पाणी पुरवठा विभागाकडून अशुद्ध पाणी पूरवठा झाल्याने येथील नागरीक त्रस्त झाले आहेत. माजलगांव नगर परिषदेचा कारभार गढूळ झाला असून सतत वादच्या भोव-यात असलेल्या नगर परिषदेतील कुठलाही अधिकारी वेळेवर कार्यालयात हजर रहात नसल्याने कुणाचाही अंकूश राहीलेला नसल्याचे बोलले जात आहे. त्यात टेंडर धारकांचे तर न्यारेच त्यांना कुनी ही जाब विचारायला तयार नाही. पाणी पुरवठा विभागाच्या टेंडर धारकाकडून तर सततच अशुद्ध पाणी नागरीकांस प्यायला मिळत आहे. एकतर पाणी साठवणुकी साठी कुठलीही सोय नसलेल्या सर्व सामान्य नागरीकांची वस्ती असलेलं इंदिरा नगर भागात जाणीवपूर्वक म्हणल तर वावगं ठरणार नाही पण नेहमीच या ठिकाणी अशूद्ध पाणी पुरवठा केला जात असुन नागरीकांच्या मूळावर उठल्या सारखं हे नगर परिषदेचे कर्मचारी अन् पाणी टेंडर धारक वागत आहेत. हे अशुद्ध पाणी पिल्याने जेष्ठ नागरीक लहान मुले महिला मोठ मोठ्या अजारांना बळी पडत आहेत. मशाळ व पिवळसर वास युक्त पाणी पिल्याने मळमळ , उल्टी होणे , डोकं दुखनं , अंगाला खाज येणे आदी आजाराने येथील नागरिक त्रस्त झाले असून ओएस किंवा पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी कुठलीही प्रतिक्रिया देण्यास तयार नाहीत.






## जेष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या वरील हल्ल्याचा वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने निषेध

वडवणी/ प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुका, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, डिजिटल मिडियाचे सर्व पदाधिकारी सदस्य पत्रकार यांच्या वतीने मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर यांचे आदेशानुसार व डिजिटल मिडिया राज्य कार्याध्यक्ष अनिलराव वाघमारे यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर पुण्यात हल्ला करण्यात आला आहे..या झुंडशाहीच्या विरूध्द सर्वांनी व्यक्त झालं पाहिजे..या हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी व यातील दोषींवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी आज दि.११ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी १२.०० वाजता वडवणी पोलिस स्टेशनमध्ये सहायक पोलिस निरीक्षक यांना लेखी निवेदन देऊन जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला

यावेळी मराठी पत्रकार परिषद डिजिटल मिडिया राज्य कार्याध्यक्ष अनिलराव वाघमारे, अँड विनायक जाधव (मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुका अध्यक्ष ),मा.सतिषराव सोनवणे ( सचिव )मा.सुधाकर काका पोटभरे(पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका निमंत्रक)मा.महेशराव सदरे(पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका समन्यक), शांतिनाथ जैन कोषाध्यक्ष, धम्मपाल डावरे पत्रकार, हरिभाऊ पवार, शंकर झाडे पत्रकार, वाजेद पठाण पत्रकार, अतुल जाधव पत्रकार, संभाजी लांडे पत्रकार, अर्जुन मुंडे पत्रकार, शेख एजाज पत्रकार, ओमप्रकाश साबळे संपादक, गीतांजली लव्हाळे मॅडम पत्रकार यासह इतर अनेक जण उपस्थित होते.

# कथनी और करणी यात फरक न करणार नेता म्हणजे विनायकराव मेटे

## शहेंशाहवली दर्गा विकास कामांच्या भूमिपूजनप्रसंगी डॉ. ज्योती मेटे यांचे प्रतिपादन

बीड ।प्रतिनिधी

लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेब यांच्या प्रयत्नाने मंजुर २१५.२६ लक्ष रुपयांच्या बीड येथील हजरत शहेंशाहवली दर्गा विविध विकास कामांचा भुमिपूजन सोहळा आज रवीवार ,दि. ११ फेब्रुवारी रोजी दुपारी .डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी मंचावर मुस्लिम धर्मगुरू, माजी आ. शिराज देशमुख, जहीर कादरी, मोईन मास्टर, फारुक पटेल, शेख निजाम, शेख शफीक भाऊ , मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक बी बी जाधव, शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण काशीद,अनिल घुमरे ,सुहास पाटील,नवनाथ प्रभाळे आदी प्रमुख पदाधिकारी, तसेच प्रतिष्ठित मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत शहेंशाहवली दर्गा येथे संपन्न झाला.

मागील अनेक वर्षापासून विकासापासून दूर असलेल्या शहेंशाहवली दर्गा परिसर विकासाच्या प्रतीक्षेत होता मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले बीड येथील ऐतिहासिक सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे या हेतूने लोकनेते विनायकराव मेटे यांनी बीड येथील श्रीक्षेत्र कंकालेश्वर आणि हजरत शहेंशाहवली दर्ग्याला जवळपास सात कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर करून आणला स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या दुर्दैवी निधनानंतर त्यांच्या पश्चात डॉ.ज्योती मेटे यांनी पाठपुरावा करत या कामांचे भूमिपूजन करत विकास कामांना चालना दिली आहे.

महाराष्ट्राला सांस्कृतिक संपन्न वारसा आहे त्याला बीड जिल्हा देखील अपवाद नाही त्यामुळे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे या हेतूनेच आज आपण या ठिकाणी विकास कामांचा शुभारंभ करत आहोत. मागील अनेक वर्षापासून या ठिकाणी विकास झाला नाही परंतु समाज घटक म्हणून लोकप्रतिनिधी समाज सुधारक आणि सर्वांची जबाबदारी आहे आपल्या भागाचा विकास झाला पाहिजे. विनायकराव मेटे यांनी बीडचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याचा संकल्प हाती घेतला होता.आज त्याची स्वप्नपूर्ती होत आहे. तसेच कथनी और करणी यात फरक न करणारा नेता म्हणजे विनायकराव मेटे होते असे मत यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमानंतर उपस्थित असलेल्या सर्व भाविक भक्तांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात करण्यात आली होती. याप्रसंगी नगरसेवक अशफाक इनामदार, जयतुल्ला खान, सादिक अली, जलील पठाण,शेख



### कोण काय म्हणाले..

मागील पन्नास वर्षापासून दर्ग्याचा विकास झाला नाही याबाबत फक्त राजकारण करण्यात आले विनायकराव मेटे यांनी याकडे लक्ष घालून यासाठी निधी उपलब्ध करून दिला मेटे साहेब हे फक्त बोलणारे नेते नव्हते तर ते प्रत्यक्षात काम करणारे नेते होते मुस्लिम आरक्षणाबाबतीत देखील फक्त गप्पा न मारता विधानसभेत आवाज उठवण्याचे काम केले त्यामुळे मेटे साहेब हे बोले तैसे चाले या युक्ती प्रमाणे काम करणारे नेते होते असे शिवसेनेचे शहर अध्यक्ष शेख निजाम यांनी म्हंटले.

### भूमिपूजनप्रसंगी मुस्लिम समाजातील सर्वपक्षीय नेते एकवटले



## संपादकीय

# आयुष्य फेसबुक लाइव्हवर नको

हे खरंय की पूर्वीच्या काळी म्हणजे खूप जुन्या काळी फारशा सोयी-सुविधा नव्हत्या. माणूस पुढारलेला नव्हता. छोटसं घर, त्याच्याभोवती छोटीशी शेती, पशुपक्षी आणि तो, त्याचं कुटुंब असा तो जगत असे. त्याची दिनचर्यासुद्धा खूप मर्यादित स्वरूपाची एक साधीशी असे. त्याच आयुष्य अत्यंत साधे होते; परंतु त्या काळी मनुष्य खूप सुखी होता असं आत्ताच्या आधुनिक पुढारलेल्या काळामध्ये म्हटलं जात आहे. याचं कारण वेगवेगळ्या प्रकारची भौतिक सुखं मनुष्याच्या आजूबाजूला हात जोडून उभी आहेत, अर्थात याला कारणही माणसाने केली वैज्ञानिक भौतिक प्रगती हे आहेच, त्यांनी लावलेले वेगवेगळे शो, सुखासाठी शोधलेले नवनवे मार्ग, याच्यामुळे माणूस आज सुखी झाला आहे. मात्र तो समाधानी झाला आहे का? हा प्रश्न नेहमीच पडतो. हा प्रश्न पडण्याची कारण सुद्धा गेल्या काही वर्षांपासून समोर येतात. त्यातच आपापसातील हेवेदावे, वाढणारा हिंसाचार, एकमेकांचा जीव घेणे, स्वतःचा जीव देणे अशा घटना त्याच्या तीव्रतेसह सातत्याने वाढताना दिसत आहेत.

गेल्या काही दिवसांमध्ये ज्या घटना आजूबाजूला आपण घडताना पाहतो, बघतो त्या पाहता खरंच मनुष्य सुखी आहे का? समाधानी आहे का? हा मोठा प्रश्न निर्माण होतो. पूर्वीच्या काळातील वातावरण, पूर्वीच्या काळातील सामाजिक चौकट, कौटुंबिक चौकट ही मर्यादित स्वरूपाची होती. एका घरात अनेक माणसं राहत असत. मात्र ते घर आनंदाने, एकोप्याने नांदत असे. पण ज्यावेळी मनुष्याच्या भौतिक सुखाच्या परिभाषा बदलल्या, तेव्हापासून घरातीलही सुख समाधानाचे चित्र बेरंगी होऊ लागलं. मनुष्याने 'सुख म्हणजे नक्की काय असतं' याची व्याख्या खरं तर करून ठेवायला पाहिजे.

सुख म्हणजे भौतिक सुख असतं का? घरासमोर चांगली चारचाकी गाडी, टुमदार घर, घरामध्ये फर्निचर, सगळ्या प्रकारच्या सोयी-सुविधा, बँकेमध्ये भरगच्च बॅलन्स, वाटेल तेव्हा पैसे खर्च करण्याची मुभा म्हणजे सुखी समाधानी जीवन आहे का? हा प्रश्न आहे. कारण हे सगळं मिळवण्यासाठी आज मनुष्य ज्या पद्धतीने धावतोय, स्पर्धा करतोय ते पाहता ते सुखसुद्धा त्याला अनेकदा उपभोगता येतं नाहीय. मग तो उद्योजक असू दे, व्यावसायिक असू दे, नोकरदार असू दे अगदी विद्यार्थी असू दे प्रत्येकजण आज स्पर्धेमध्ये कुणालातरी मागे टाकण्यासाठी धावत आहे. आज मला याच्यापुढे जायचे असं म्हणून तो स्वतःच्या आयुष्याला वेग देतो अर्थात हे धावणं आज अपरिहार्यता झालेली आहे, ही गोष्ट गरजेचे झाली आहे. आजच्या काळामध्ये जर तुम्ही धावला नाहीत, तर तुम्ही संपलात ही साधी सहज आणि सोपी व्याख्या जीवनाची बनली आहे. तुम्हाला जगायचंय असेल, तर तुम्हाला धावलच पाहिजे अन्यथा तुम्हीच प्रत्येक आघाड्यांवर अपयशी होताना दिसून येता. शाळेमध्ये केजीपासून पीजीपर्यंत स्पर्धा आहे.

करिअरमध्ये स्पर्धा आहे, नोकरी मिळवताना स्पर्धा आहे, उद्योग-व्यवसाय करताना स्पर्धा आहे. अशा वेळी आयुष्यात येणारे ताणतणाव हे मनुष्याच्या वैयक्तिक जीवनावरसुद्धा खूप मोठ्या प्रमाणात परिणाम करताना दिसतात. त्याच्यातली प्रेम, सहानुभूती, दया या भावना हळूहळू नष्ट होताना दिसत असून तो जास्त क्रूर होताना दिसत आहे. तो सतत अस्वस्थ असलेला दिसू लागला आहे. मन अस्थिर असलेले अनेकजण आजूबाजूला आपण पाहत असतो. अशा वेळेला, या प्रचंड प्रवाहात वाहून जाताना मनुष्याला कुठे थांबायचं आहे हे माहीत नसतं

# तहसीलदार हटाव माजलगाव बचाव
# आंबेडकरी विचार मोर्चाची मागणी

## अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करू - ॲड.ए.एन. सय्यद

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे सुरू असून त्यांना खत पाणी घालणाऱ्या तहसीलदार महोदयांची तात्काळ बदली करून 'तहसीलदार हटव माजलगाव बचाव' मागणीसाठी आंबेडकरी विचार मोर्चा तथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड.ए.एन. सय्यद यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले आहे. असे की,माजलगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे सुरू असून गोदावरी व कुंडलिका नदीपात्रातून अवैध प्रकारे वाळू उपसा करून शासनाचा मोठ्या प्रमाणावर शुल्क बुळविला जात आहे वाळू माफिया खुलेआम तालुक्यात वाळू तस्करी करत आहे. पुरवठा विभाग व राशन दुकानदारांचा मनमानी कारभार सुरू आहे संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वेळेवर पैसा भेटत नसून जेगर्जुवांत आहे त्यांच्या नावाचा समावेश केला जात नाही.शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्पन्न व जात प्रमाणपत्रसाठी कार्यालयात चक्रे माराव्या लागतात कर्मचारी व अधिकारी वेळेवर नसल्याने विद्यार्थ्यांची आर्थिक व मानसिक पिळवणूक होत आहे.

तसेच तालुक्यात गायरान जमीन,सिलिंग जमीन व ईनामी जमिनीवर भूमाफियांकडून खुलेआम मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केली जात आहेत तालुक्यात वरील शासन अंतर्गत येणाऱ्या जमिनीचे



मोठ्या प्रमाणात अवैध प्रकारे फेरफार झाले असून ते फेरफार रद्द करण्याची वेळोवेळी मागणी करण्यात आली आहे.यासंदर्भात तहसीलदार साहेबांकडे दिलेले अनेक अर्ज प्रलंबित असून ते अर्ज ही मार्गी लावले जात नाही. जे प्रलंबित आहे त्यांचे सोनवणे घेण्यास अधिकारी टाळाटाळ करीत आहे.

वरील सर्व बाबींना जबाबदार असलेल्या तहसीलदार महोदया यांची तात्काळ बदली करून माजलगाव तालुक्याला भूमाफिया,वाळू माफिया यांच्यापासून वाचविण्यात यावे अन्यथा येत्या १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय समोर लोकशाही मार्गाने आंदोलन करू असे आंबेडकरी विचार मोर्चा तथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने दिनांक ७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

# आधुनिक काळात स्त्री सबलीकरण काळाची गरज- श्रीमती विजयाताई मारोतकर

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात आयोजित 'पोरी जरा जपून' या विषयावर विषय मांडणी करताना विजयाताई मारोतकर यांनी सांगितले की, मुलींनी आपल्या मनातील न्युनगंड दुर प्रत्येक उत्स्फूर्त सहभाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी बजावली पाहिजे, आधुनिक काळात स्त्री सबलीकरण ही गरज आहे, महिला व मुलींना विविध क्षेत्रात संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत ही अपेक्षा न ठेवता आपण संधी निर्माण केली पाहिजे, आज प्रत्येक क्षेत्रात महिला अग्रेसर ठरताना आपण पाहत आहोत. या कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाले. प्रथम मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीत श्रीमती सुलभा जोशी, श्रीमती प्रज्ञा भानप या होत्या, त्यानंतर मार्गदर्शन करताना सांगितले की मुली आज चुल आणि मुल याच्यापुढे जाऊन गगन भरारी घेत आहेत पण आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात टीव्ही, मोबाईल ,संगणक यांच्यापासून होणारे दुष्परिणाम त्यांनी सांगितले आपले कुटुंब आज विभक्त होत आहे .आजी आजोबा कुटुंबातील संवाद




कमी कमी होत आहे त्यामुळे मुली आज एकट्या पडत आहेत आई- वडिलांकडे वेळ नसल्यामुळे त्याचा गैरफायदा समाजातील वाईट लोकांच्या नजरा आज आपल्या मुलींवर पडत आहेत, आपल्या आयुष्यातील तीन 'प' महत्त्वाचे आहेत१) पिता २) पती ३) पुत्र हेच आपली खरी काळजी घेतात आजचा हा त्यांचा ३९३ वा कार्यक्रम आपल्या विद्यालयात

तिरंग्याच्या तीन रंगाप्रमाणे आपली आहार पद्धतीचे पालन करणे, १०९१,१०९८ या मोबाईल नंबर वर निर्भया, पथक दामिनी पथक आपल्या मदतीच्या वेळी आपल्याला उपयुक्त ठरेल असे सांगितले स्वतःचे रक्षण स्वतःच केले पाहिजे कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी स्वतः लेखन केलेले पुस्तक 'पोरी जरा जपून, कवेत अंबर घेताना' हे दोन पुस्तक विद्यार्थिनींना भेट देऊन सर्व मुलींकडून प्रतिज्ञा म्हणून घेतली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती आशालता करपुडे यांनी केले, आभार श्रीमती प्रज्ञा देशपांडे यांनी मानले, वैयक्तिक पद्य श्रीमती स्वप्ना देशपांडे कल्याण मंत्रांनी कार्यक्रमाची सांगता झाली हा कार्यक्रम शाळेचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. तसेच उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे पर्यवेक्षक रवींद्र खोडवे , सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



## जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान कडुन लिंबागणेश येथे रक्तदान शिबिर संपन्न

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड जिल्हा येथील स्व -स्वरूप संप्रदाय आणि जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान यांच्या वतीने रुग्णांची रक्ताची गरज भागविण्यासाठी बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी १० ते २५ फेब्रुवारी कालावधीत महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असुन आज दि.११ फेब्रुवारी रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालय येथे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा रुग्णालय बीड रक्तपेढी मार्फत डॉ.स्वप्निल देशमुख, रक्तपेढी तंत्रज्ञ नितिन साळुंके, रामनाथ खेडेकर, सचिन सतकर उपस्थित होते.शासकीय रक्तपेढ्या रक्त संकलित करून गरजुंना मोफत रक्त पुरविण्यात येणार असल्याचे स्व - स्वरुप संप्रदायाचे बीड जिल्हाध्यक्ष दत्ता घरत यांनी सांगितले.यावेळी लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,सेवा सोसायटी चेअरमन रविबापु निर्मळ, राजेंद्र ढास, आदि उपस्थित होते.रक्तदान शिबिरासाठी संप्रदायाचे बीड जिल्हा ब्लड इन नीड प्रमुख शुभम गिरी, बीड तालुकाध्यक्ष गोपाल सिकची, कम्प प्रमुख आण्णा जाधव, माजी सैनिक सतिश क्षीरसागर,बप्पा काटवटे,लखन आमटे, सखाराम गाडवे, नामदेव घरत,अर्जुन जगदाळे,आश्रुबा घरत,सुरज जगदाळे रामहरी जाधव,भारत भोसले आदींनी परिश्रम घेतले.

# केजच्या विक्रमराव मुंडे पोद्दार लर्न स्कुलचे स्नेहसंमेलन उत्साहात

### प्रा.माधुरीताई मुंडेंच्या संकल्पनेतून सादर झालेल्या रामायण कथेने उपस्थितांची मने जिंकली

केज ।प्रतिनिधी

रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठान संचलित विक्रमराव मुंडे पोद्दार स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार (दि.१०) रोजी अनेक मान्यवर व पालकांच्या उपस्थितीत पार पडले.या स्नेह संमेलनात विद्यार्थ्यांनी विविध सामजिक विषय हाताळत उत्कृष्ट नाटिका तसेच नृत्यांद्वारे समाजामध्ये सकारात्मक संदेश पोहोचविला.रेणूका माता कृषी विकास प्रतिष्ठाण संचलित विक्रमराव मुंडे पोद्दार लर्न स्कुल केज या शाळेचे वार्षीक स्नेहसंमेलन शनिवार (दि.१०) रोजी संपन्न झाले.स्नेह संमेलनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे व सौ. कृष्णाबाई मुंडे यांच्या शुभहस्ते



करण्यात आले.यावेळी केजच्या आ.सौ नमिताताई मुंदडा यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यां समवेत सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांनी सादर केलेले विविध नाट्य,नृत्याचे कौतुक केले.स्कुलच्या विद्यार्थ्यांनी रामायण कथेवर आधारित विविध प्रसंगांचे नाट्यीकरण करून विविध गाण्यांवर उत्तम प्रकारे नृत्याचे सादरीकरण केले.पोदार जम्बो किडच्या विद्यार्थ्यांनी नवीन शैक्षणिक धोरण छएझ २०२० यावर आधारित नाटिकेसह नृत्य सादर केले.यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष विजयकांत मुंडे,संस्थेचे सचिव अतुल मुंडे,सौ.रूपालीताई मुंडे यांनी उपस्थित पालकांचे आभार व्यक्त केले.तर कार्यक्रमाची यशस्वी संकल्पना प्रा.माधूरीताई मुंडे यांनी पार पाडली.यावेळी शाळेचे प्रा.आनंद मरळगोईकर सर,मुख्याध्यापिका सौ.राधा बन्साळी मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक वृंद,प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी पालकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## भारतीय जनता पक्षाच्या कामगार मोर्चा तालुकाध्यक्षपदी व तालुका संयोजक पदी ऋषिकेश स्वामी यांची निवड

माजलगाव ।प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या कामगार मोर्चा माजलगाव तालुकाध्यक्षपदी व तालुका संयोजक पदी ऋषिकेश स्वामी यांची निवड रविवारी भारतीय जनता पक्षाच्या बैठकीत एकमताने घेण्यात आली.भाजपा बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, कामगार मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे, बीड जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गिरी यांनी निवडीचे पत्र स्वामी यांना दिले. माजलगाव येथील ऋषिकेश स्वामी हे गेल्या काही वर्षांपासून कामगारांसाठी विविध योजना मार्गी लावत आहेत. तळागाळातील मजुरांना आधार देण्याचे काम करत आहेत. याचाच दाखला घेत भाजपा पक्षाने कामगार मोर्चाच्या माजलगाव तालुकाध्यक्षपदी निवड केली असून भाजपा, तालुकाध्यक्ष अरुण राऊत यांच्यासह पक्ष व कामगार संघटनांनी त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# शिवसेना उपनेत्या अंधारे यांनी मातृतीर्थ ते शिवतीर्थ मुक्त संवाद यात्रेत

## पिंपळनेर सर्कल मधील शेतकऱ्यांशी साधला संवाद

पिंपळनेर ।प्रतिनिधी

मातृतीर्थ ते शिवतीर्थ मुक्त संवाद यात्रा आज पिंपळनेर मध्ये आली असता शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी त्यांचे पिंपळनेर मध्ये त्यांचे वाजत गाजत जंगी स्वागत केले,व शिवसेना उपनेत्या सुष्माताई अंधारे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब, यांच्या हस्ते आशापुरक गणपती मंदिरात गणपतीची आरती संपन्न झाली.

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व शिवसेना उपनेत्या सुष्माताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेली मातृतीर्थ ते शिवतीर्थ मुक्त संवाद यात्रा आज पिंपळनेर मध्ये आली असता पिंपळनेर मध्ये त्यांचे वाजत गाजत जंगी स्वागत केले,व शिवसेना उपनेत्या सुष्माताई अंधारे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब, माजी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे सह संपर्क प्रमुख बदामराव आबा पंडीत, माजी आमदार तथा लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटीका संगीताताई चव्हाण, युवा सेना जिल्हाप्रमुख गजानन कदम, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे यांच्या हस्ते आशापुरक गणपती मंदिरात गणपतीची आरती संपन्न झाली. व नंतर शिवसेना उपनेत्या सुष्माताई अंधारे व बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब यांनी पिंपळनेर व आजूबाजूच्या शिवारातील शेतकऱ्यांशी मुक्त संवाद साधला.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, बीड




तालुका प्रमुख गोरख आण्णा शींघण, गेवराई तालुका प्रमुख अजय दाभाडे, जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, प्रभारी शिरूर तालुका प्रमुख सोपान मोरे,विनोद गुंड पाटील,सह सर्व शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, शेतकरी सेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांनी तोडला ऊस

संभाजी लांडे ।वडवणी

मातृ तीर्थ ते शिवतीर्थ मुक्त संवाद अभियान शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत. वडवणी तालुक्यातील परडीमाटेगाव,केंडेपिंपरी (धा), रत्नापुर(खापरवाडी), देवगाव, लवुळ नं २,काडीवडगाव तसेच देवडी या ठिकाणी भेट गाठी, शेतकरी संवाद, ऊसतोड मजूर यांच्याशी चर्चा झाली. शेतकरी कामगार यांच्याशी चर्चा करुन समस्या जाणुन घेतल्या या वेळी उपस्थित. शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, परमेश्वर सातपुते, शिवसेना वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे, जिल्हा सहसचिव युवराज मामा शिंदे, रामराजे सोळंके, अशोक जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख रवींद्र बडे, महादेव सातपुते, उपतालुका प्रमुख अशोक गोंडे, श्रीराम झाटे, सचिन दरेकर, बालासाहेब शेप, धनंजय झाटे, सचिन धपाटे, सरपंच संजय धपाटे, उध्दव काकडे, महेश जाधव, भैय्या खौसे, आणासाहेब शिंदे, आतुल राऊत, अकाश सावंत, मोहन शेळके,, परडीमाटेगावचे चेअरमन,अजय खांडवे, अजय लंगडे, नवनाथ मोरे, दिपक झाडे, मधुकर नागरगोजे, गणेश शेद्रे, तुकाराम



बादाडे, श्री बादाडे, अर्जुन बादाडे, शिवाजी बादाडे,रवी शेंडगे पाटील, पत्रकार अविनाश मुजमुले तसेच उपस्थित शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक, शेतकरी मोठय़ा संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याकडून १३ जानेवारी अखेरील पहिला हप्ता प्रति टन रु.२७००/- प्रमाणे जमा

माजलगावं / प्रतिनिधी

येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन.२०२३-२४ चा ऊस गळीत हंगाम सुरु असुन दिनांक ०८/०१/२०२४ ते १३/०१/२०२४ या कालावधीत गाळपास आलेल्या ऊस बिलाचा पहिला हप्ता प्रति मे.टन रुपये २७००/- प्रमाणे ऊस उत्पादक शेतकरी यांचे बैंक खाती जमा केला असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन श्री. विरेंद्रभैय्या सोळंके यांनी दिली.या चालु गळीत हंगामामध्ये माआ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब,

उपाध्यक्ष साखर संघ मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे ऊस गाळप सुरु असुन दिनांक ०७/०२/२०२४ अखेर ९४ गाळप दिवसामध्ये ४६०६५० मे.टन ऊसाचे गाळप करुन ९.९४ टक्के सरासरी साखर उतार्याने २९१९५० क्विंटल शुभ्र साखरेचे उत्पादन घेण्यात आलेले आहे. चालू हंगामात कारखान्याकडील इथेनॉल व को.जन प्रकल्प कार्यान्वीत असुन आजअखेर सिरप इथेनॉल ८६५७७१८ लिटर, बी.हेवी इथेनॉल २४१६९४४ लिटर व सी. हेवी इथेनॉल ९४०८६२ लिटर उत्पादन झाले असुन २३२८९६०० युनीट विज महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीस वितरीत केलेली आहे. दिनांक ०७/०१/२०२४ पर्यंत गाळप झालेल्या ऊसाचा पहिला हप्ता रुपये २७००/- प्रमाणे होणारी रक्कम यापूर्वीच ऊस उत्पादकांचे बँक खाती वर्ग करण्यात आलेली होती.

पुढील कालावधीत म्हणजेच दिनांक ०८/०१/२०२४ ते १३/०१/२०२४ या कालावधीत ३५१९९.४४९ मे.टन गाळप झालेल्या ऊसाचा पहिला हप्ता प्रती मे.टन रु.२७००/- प्रमाणे होणारी एकुण रक्कम रुपये ९.५० कोटी ही दिनांक ०७/०२/२०२४ रोजी संबंधीत ऊस उत्पादकांचे बँक खाती वर्ग केलेली आहे. तरी वरील कालावधीत ज्या ऊस उत्पादकांचा ऊस गाळपास आलेला आहे त्यांनी आपल्या नजिकच्या बँकेशी संपर्क साधुन आपल्या ऊस बिलाची रक्कम घेवुन जावी असे आवाहन कारखान्याचे चेअरमन श्री. विरेंद्रभैय्या सोळंके यांनी केले आहे.


# एमएच नर्सिंग सीईटी २०२४ परीक्षेसाठी नाव नोंदणी प्रक्रिया सुरू - एस.एम.युसूफ

## २९ फेब्रुवारी पर्यंत इच्छुकांनी ऑनलाइन नाव नोंदणी करावी

बीड (प्रतिनिधी)

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम वर्ष बी. एस्सी. नर्सिंग, सहाय्यक परिचर्या प्रसाविका (ए.एन.एम.) व सामान्य परिचर्या व प्रसाविका प्रशिक्षण (जी.एन.एम.) या आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एमएच-नर्सिंग सीईटी २०२४ ही सामाईक प्रवेश परीक्षा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत महाराष्ट्र राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी नोंदणी करण्याची शेवटची तारीख दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ आहे. तत्पूर्वी इच्छुकांनी ऑनलाइन पद्धतीने या परीक्षेसाठी नाव नोंदणी करावी असे आवाहन मुक्तपत्रकार तथा शिक्षणमित्र एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

या विषय दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, या परीक्षेसाठी ऑनलाईन नोंदणी व नोंदणी अर्ज निश्चित करण्याकरिता दिनांक ०९ फेब्रुवारी २०२४ ते २९ फेब्रुवारी २०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. तर ऑनलाईन पध्दतीने नोंदणी शुल्क भरणा (यशस्वी शुल्क भरणा झालेलेच नोंदणी अर्ज विचारात घेण्यात येतील) साठी ०१ मार्च २०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. याविषयी अधिक माहितीसाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर ु.ारहरलशीं.ीस सुद्धा भेट देवू शकतात. अशी माहिती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई चे आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी महेन्द्र ब. वारभुवन, भा.प्र.से. यांनी काढलेल्या परिपत्रकातून दिली असल्याचे मुक्तपत्रकार तथा शिक्षणमित्र एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.



# शिक्षकाची महिला कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी

## शिक्षण विभागात एकच खळबळ

बीड । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना बीड जिल्ह्यात नुकतीच उघडकीस आली होती. एका शिक्षकाने गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी केली होती. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीनंतर शिक्षण विभागात खळबळ उडाली. या घटनेची गंभीर घेतली असून शिक्षकाला तात्काळ निलंबित करण्यात आलं. मात्र, आता पुन्हा एकदा आरोपी शिक्षकाच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

धारूर तालुक्यातील आवरगाव येथील रमेश विष्णू नखाते यांचे अंजनडोह केंद्राचे तत्कालीन प्रभारी केंद्रप्रमुख असताना केलेल्या आपहार प्रकरणी कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल झाला होता. त्याप्रकरणी संबंधितास निलंबित करण्यात आले होते. निलंबन कालावधीत रमेश नखाते याला माजलगाव गटशिक्षणाधिकारी कार्यालय




देण्यात आले होते. निलंबनामध्ये सहभाग असल्याचा समज करून त्याने धारूर येथील एका महिलेस मागील सहा महिन्यापासून त्रास देण्यास सुरुवात केली. वारंवार घरासमोरुन फेरी मारणे. फोन करून त्रास देणे. तसेच खालच्या भाषेमध्ये बोलणे. या त्रासाला कंटाळलेल्या महिने पोलीस ठाणे गाटत गुन्हा दाखल केला आहे.

### शिक्षकावर बडतर्फीची टांगती तलवार

गटशिक्षणाधिकारी कार्यालयात कार्यरत महिला शिक्षिकेचा विनयभंग करणाऱ्या शिक्षकावर जिल्हा परिषद सीईओ यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. बीडच्या धारूर तालुक्यातील शिक्षक रमेश नखाते असं शिक्षकाचं नाव आहे. रमेश नखाते यांनी धारूर गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी केली होती. या प्रकरणी त्याच्यावर धारूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात रमेश नखाते याला जि. प. सीईओ अविनाश पाठक यांनी निलंबित केले.



किल्ले धारूर येथे आज रोजी दिनांक ११/२/२०२४रोजी गोपालपुर या ठिकाणी गांव चलो अभियान व भायजली या ठिकानी बस्ती भेट व संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते तसे पंडित दीनदयाल उपाध्याय जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले व भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगराध्यक्ष डॉ.स्वरूपसिंह हजारी साहेब उपसभापती सुनिलराव शिनगारे तालुका अध्यक्ष एडवोकेट बालासाहेब चोले शहर अध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे युवा मार्च शहर अध्यक्ष ऍड मोहन भोसले सोशल मीडिया सयोजक रोहनसिंह हजारी मन की बात सयोजक रामप्रभु मुंडे राधाकृष्ण महाराज चोले गावातील महिला व ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते




# हळदीकुंकू कार्यक्रमात २५० कचराकुंडी वाटप कुमशीच्या सरपंच स्वाती शरद निकम यांचा उपक्रम

बीड (प्रतिनिधी)

तालुक्यातील कुमशी येथील सरपंच स्वाती शरद निकम यांच्याकडुन गावाच्या विकासाच्या दृष्टीने नेहमीच समाजपयोगी उपक्रम राबवले जातात.शिक्षण, आरोग्य,स्वच्छता यावर कायम भर असतो.नुकत्याच पार पडलेल्या हळदीकुंकूवाच्या कार्यक्रमात २५० महीलांना कचराकुंडीचे वाटप करण्यात आले.महीलांसाठी हळदी कुंकू या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमामध्ये महीलांना स्वच्छतेची सवय लागावी गाव कचरामुक्त व्हावे या उद्देशाने आलेल्या प्रत्येक महीलेला एक कचराकुंडी भेट देण्यात आली.या कार्यक्रमासाठी सरपंच स्वाती शरद निकम,उपसरपंच वंदना विनोद काशीद तसेच ग्रामपंचायत महीला सदस्य विमल उमाप,पुष्पा निकम,पुजा करपे,मंदा ढोरमारे यांनी परिश्रम घेतले.यावेळी गावातील महीलांची मोठया संख्येने उपस्थिती होती.



# गोरख काळे यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सामाजिक न्याय विभागाच्या शहर उपाध्यक्षपदी गोरख काळे यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे त्यांना या निवडीचे पत्र मान्यवरांच्या हस्ते प्रधान करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनील मगरे यांच्या संमतीने जिल्हाध्यक्ष आनंद सरपते विजयसिंह बांगर ,यांनी गोरख काळे यांची निवड केली असून त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे योगेश क्षीरसागर, सावता परिषदेचे कल्याण आखाडे राष्ट्रवादीचे ,अविनाश नाईकवाडे,जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, आदींनी अभिनंदन करत काळे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# महाराष्ट्र नवनिर्माण सेना महिला आघाडीच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम

## विधवा महिलांचा म्हाळसा प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान!

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र नवनिर्माण सेना व म्हाळसा प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या गया नगर येथील निवासस्थानी हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. विशेष म्हणजे या ठिकाणी विधवा माता भगिनींचा हळदी कुंकू देऊन सन्मान करण्यात आला. समाजातील अनिष्ट रूढीवर घात करत हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शहरातील महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष व म्हाळसा प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्याकडून विविध सामाजिक उपक्रम नेहमीच राबवले जाते. संक्रात निमित्त महिलांना वान देऊन सन्मान करण्याची परंपरा आहे. गया नगर येथील निवासस्थानी महिलांचा सन्मान करत हळदी कुंकू व वान देत महिलांचा सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे या ठिकाणी विधवा माता भगिनींनाही हळदी कुंकू व वान देत सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वर्षाताई जगदाळे यांनी आलेल्या सर्व महिलांचा सन्मान केला.

# गढी महाविद्यालयात आनंदनगरीतून विविध खाद्यपदार्थांची रेलचेल

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे सांस्कृतिक, विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आनंदनगरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या आनंदनगरीच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून जय भवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका श्रीमती आशा वराट उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर आय.क्यू.एसी समन्वयक प्रा. डॉ. अयोध्या पवळ, विद्यार्थी विकास प्रमुख प्रा.हिरा पोटकुले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.राणी जाधव,लोक प्रशासन विषयाच्या प्रा.शिल्पा ससाणे या उपस्थित होत्या.

तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.डॉ. सदाशिव सरकटे हे उपस्थित होते.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी आनंदनगरीच्या उद्घाटक श्रीमती आशा वराट यांनी असे प्रतिपादन केले की की, भारतामध्ये विविध प्रदेशांमध्ये विविध खाद्यपदार्थ तयार केले जातात. ही खाद्य संस्कृती जतन करण्यासाठी आज महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या आनंदनगरीचा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त आहे. या आनंदनगरीच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विविध प्रांतीय पदार्थांची ओळख होते. पदार्थ तयार करून त्याची विक्री करण्यातून जो आनंद प्राप्त होतो. त्याचा आनंद विद्यार्थ्यांना घेता येतो. या आनंदनगरीमध्ये मुलींपेक्षा मुलांचा सहभाग अधिक आहे ही अत्यंत कौतुकाची बाब आहे. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफे डॉ. सदाशिव सरकटे यांनी असे प्रतिपादन केले की विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेचा विकास करण्यासाठी आनंदनगरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चांगली संधी आहे. यामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारिकता,खरेदी,विक्री, नफा, तोटा या संकल्पना प्रत्यक्षात अनुभवता येतात. भविष्यातील उद्योजकता विकास व कौशल्य विकास यासाठी अशा प्रकारचे उपक्रम सहाय्यकारी ठरतात. त्यामुळे या उपक्रमात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला पाहिजे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रोफे.डॉ. संतोषकुमार यशवंतकर, प्रास्ताविक प्रा.हिरा पोटकुले , तर आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास विभागाचे प्रोफे.डॉ. धर्मराज कटके यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागाचे प्रा.डॉ . शिवलाल घुगे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रोफे. डॉ. रामहरी फाटक,प्रा. प्रा. डॉ.शिवाजी काकडे यांच्यासह



महाविद्यालयतील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कार्मचारी यांनी परिश्रम घेतले. या आनंदनगरीत विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल मांडले होते. यामध्ये इडली डोसा,सांबर चटणी, पालकाचे पराठे- चटणी, दशमी दही चटणी, वांग्याचे भरीत,लिंबू पाणी, फ्रुट सॅलड, पाणीपुरी, मसाला पापड, विविध प्रकारच्या मिठाई इ. समावेश होता. या आनंद नगरीचा महाविद्यालयातील प्राचार्य.प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे यांच्यासह सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयीन विद्यार्थी, शाळेतील विद्यार्थी यांनी मनसोक्त आनंद घेतला.

# दिंद्रूड येथे एड्स व गुप्तरोग बाबत कलापथकाचे शाहिरीतुन प्रबोधन

**माजलगांव (प्रतिनिधी)**

**एच आय व्हि (एड्स) व गुप्तरोग प्रतिबंध उपचार आणि नियंत्रण - २०२४ कार्यक्रमांतर्गत दिंद्रूड येथे प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष बीड च्या अधिपत्याखाली, ग्रामीण रुग्णालय चिंचवण व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र दिंद्रुड यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी दुपारी येथील बसस्थानक परिसरात हा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमात लोकशाहीर विठ्ठल काटे यांच्या कलापथकाने शाहिरीतुन प्रबोधन केले.**



राष्ट्रीय एडस नियंत्रण कार्यक्रम आता पाचव्या टप्प्यात आहे महाराष्ट्र राज्य एडस नियंत्रण संस्थेमार्फत एचआयव्ही, एडस नियंत्रण व प्रतिबंधात्मक सेवा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष बीड जिल्हा रुग्णालयामार्फत पुरवल्या जात आहे. बीड जिल्ह्यात याबाबत जनजागृती करण्यासाठी पाच पथके कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली. गुप्तरोग व एडस या आजारा बाबत जनसामान्यांमध्ये असलेले गैरसमज दूर व्हावे व योग्य उपचार घेतल्यास या आजारांपासून संक्रमण होणे कसे टाळले जाईल या हेतूने लोकांचे प्रबोधन करण्यात आले.

दिंद्रुड येथे शनिवारी दुपारी बसस्थानक परिसरात हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक उपकेंद्र दिंद्रुडच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.स्वाती काशीद, समुपदेशक प्रसाद ठोसर प्रयोगशाळा तंत्रज्ञ राजश्री बावरे यांच्यासह वाल्मिक पाईक,मंदा देशमाने, अतुल चांदमारे उपस्थित होते. या कार्यक्रमास दिंद्रुड व पंचक्रोशीतील नागरिकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाच्या शेवटी प्रत्येकाने सामाजिक भान जपत आजार ग्रस्त रुग्णांना धीर द्यावे, चुकीच्या अफवा पसरवू नयेत याबाबत उपस्थितांनी प्रतिज्ञा केली.कार्यक्रमाच्या आयोजकांनी उपस्थितांचे आभार पत्रकार संतोष स्वामी यांनी मानले.

दैनिक • महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

बीड जिल्हा

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )

MONDAY DT.12 FEBRUARY 2024
सोमवार,दि.१२ फेब्रुवारी २०२४



## जि.प.मा.कन्या शाळेचा टेनिस व्हॉलीबॉल संघ राज्यस्तरावर प्रथम




माजलगाव : प्रतिनिधी

क्रिडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,जिल्हा क्रिडा कार्यालय परभणी व परभणी जिल्हा टेनिस व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय टेनिस व्हॉलीबॉल क्रिडा स्पर्धा नुतन माध्यमिक विद्यालय सेलु ता सेलु.जि. परभणी येथे दि ९ व ११ फेब्रुवारी २०२४ रोजी संपन्न झाल्या.या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यतील आठ विभागातील आठ संघ(१४ वर्ष मुली) सहभागी झाले होते. सामने बाद पद्धतीने झाले. छ. संभाजी नगर विभाग(जि.प.मा. कन्या शाळा माजलगांव)चा पहीला सामना अमरावती विभागासोबत झाला. या सामन्यात २-० ने छ. संभाजी नगर विभाग(जि.प.मा. कन्या शाळा माजलगांव)ने विजय मिळवला. उपांत्य फेरीत छ.संभाजीनगर(जि.प. मा.कन्या शाळा माजलगांव) विरूध्द नाशिक विभाग हा सामना रंगला या सामन्यात छ.संभाजी नगर विभागाने २-०ने विजय मिळवला व अंतिम सामन्यात प्रवेश केला.अंतिम सामना कोल्हापूर विभागाविरुद्ध खेळला गेला. अतिशय चुरशीच्या व रोमहर्षक सामन्यात जि.प.मा.कन्या शाळा माजलगांवच्या संघाने २-० ने विजय खेचुन अणला.या अंतिम सामन्यात कर्णधार अक्षरा पवार हीने चमकदार कामगिरी बजावली.

शालेय राज्यस्तरीय शालेय टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धात जि.प.मा.कन्या शाळा माजलगांवचा संघ राज्यात सर्व प्रथम आला.या विजयी संघाला प्रशिक्षक म्हणून शाळेचे शिक्षक सोनपसारे राज यांचे मार्गदर्शन लाभले.या विजयी संघात अक्षरा बाबासाहेब पवार (कर्णधार),सोमेश्वरी राजेश टाक,अंजली नागनाथ कुंभार,साक्षी राजेश कुलकर्णी,रूची संतोष दळवी,अलफिजा दस्तगीर शेख या १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थिनींनी अतिशय चमकदार खेळ केला. विजयी संघाला गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील लक्ष्मण पोटभरे,सचिन मोती,रवी आदमाने,आयाज सिद्दिकी व केंद्रप्रमुख बलशेटवार शिवाजी यांनी संघासाठी खेळाचे साहित्य पुरवले होते. शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गरबडे,मंदा सारुक,लता पारगांवकर, दिनकर वाघमारे,मधुकर मकसरे,बाळासाहेब सोनसळे,शरद नायबळ,संगीता राठोड,सुंदर काळे,ज्योती कोडगिरकर,विलास रेवलकर,चंद्रकांत यादव,संगीता शिंदे, बालासाहेब कांबळे,बालासाहेब जामकर,गोरख उघडे व नंदकुमार मुकाडे या सर्वांनी विद्यार्थिनींच्या विजयाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

## गेवराई सार्वजनिक शिवजन्मोत्सव कार्यकारिणी जाहीर




गेवराई / प्रतिनिधी

दि ६ रोजी सार्वजनिक शिवजन्मोत्सव २०२४ साजरा करण्यासाठी गेवराई शहरात छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल सभागृह येथे अॅड. संजय (भाऊ) काळे, रामनाथ काका गंगाधर, लहु अण्णा माने, सतिष (दादा) दाभाडे, धम्मपाल कांडेकर, डॉ उध्दव घोडके, नाना पवार, कोकाटे काका, प्रकाश घाडगे सर, बाळासाहेब बरगे, प्रमोद सेठ मोटे, राजेंद्र भैय्या मोटे, महेश बेदरे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बैठक होऊन सर्वानुमते अध्यक्षीय समितीमध्ये सर्वश्री उत्तमराव सोलाणे साहेब, अॅड. बाबासाहेब घोक्षे साहेब, जान महंमद बागवान, श्री प्रभाकर (तात्या) पिसाळ, रजनीकांत सुतार, अजय उर्फ पप्पू गायकवाड कार्याध्यक्षपदी डॉ. गणेशराव फलके, सचिवपदी श्री. शामराव गायकवाड (पाटील) तर कोषाध्यक्ष म्हणून श्री अशोक बेदरे, सह कोषाध्यक्षपदी केशवराव पंडित आणि उपाध्यक्ष म्हणून सर्वश्री माऊली बेदरे,सतिश झिरपे, जे.डी शहा इनामदार, बाबुराव गवारे, अभिषेक दाभाडे, रंजित घुंबाडे, अर्जुन सुतार, सुरेश हिंगे, विलासराव खिसाडे, बाळासाहेब आतकरे सहसचिव म्हणून श्री अतुल होके आणि अशोक जवंजाळ आणि मिरवणूक समिती वर सर्व श्री बाळासाहेब खंडागळे, करण भैया जाधव,प्रतापसेठ खरात, आनंद दाभाडे, ब्रम्हदेव (देवा) धुरंधरे, शाम काका येवले, श्रीनिवास बेदरे, विलासराव खिसाडे, अमर (बिल्लासेठ) नवपुते, जयसिंग भैया माने, सचिन पंडित, योगेश गाडे, तौर भैय्या, उमेश निकम, अभिजित काला, शेख खाजाभाई, किरण दाभाडे, रमेश पवार, रवि दाभाडे, बाळासाहेब मोटे, शिवाजी काळे, बाळासाहेब गायकवाड, रंजित डरपे, सोपान मडके, कृष्णा मोटे, श्रीराम चोरमले, नामदेव जवंजाळ, अभिजित छाजेड,आण्णासाहेब राठोड, नरेश सुतार, हरेश सेठ मंघारामाणी, अशोक गायकवाड, अणिल धापसे, विलास मस्के, गणेश मोटे, शाम रुकर, सुंदर बप्पा काळे, गणेश भैया निकम, विष्णुपंत घोंगडे, रविकिरण खंडागळे, लखन चोरमले, निखिल गाडे, डॉ मिलिंद गावडे, बाबा अवधूत, अंकुश धापसे, आकाश हादघुले, सोहेब भाई अत्तार, गोविंद निकम, निखिल जंगले, मंजूर सय्यद, गणेश नलावडे, सुरज कादे,दता आतकरे, किसन प्रभाळे, मुस्ताक राज, कैलास माने, नानासाहेब जोशी, कृष्णा मोटे, मंजूर भाई बागवान, अक्षय पवार, आनंद जाधव, धीरज वैष्णव, अमित शिखरे, शैलेश पंडित, बाबा जवंजाळ, अनभुले, राजीव डोळस, भागवत जगताप, मोहन बेदरे, माऊली अजबकर, आवेज बागवान यांच्यासह अनेक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. विविध कार्यकारणी व सदस्यांची निवड झाली.विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. विविध सामाजिक कार्यक्रम, उपक्रम राबविण्याचा निर्णय झाला त्याच बरोबर आपल्या गेवराई शहरात एक आदर्श त्याच बरोबर सर्व समाजाच्या पुरुष,महिला,युवक, शालेय मुले सक्रिय सहभाग घेण्याचा निर्णय घेण्यात आला सर्व नवनियुक्त अध्यक्षीय समिती, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष व वृत्तपत्रे आणि सोशल मीडिया समिती अंकुशराव आतकरे, कैलास भाऊ हादघुले, मधुकर तौर, काझी अमान, सुशीलकुमार टकले, भागवत जाधव, सुभाषराव शिंदे, अमोल वैद्य, अणिल आगुंडे आणि विविध समिती सदस्य यांचे हार्दिक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा देत,, जय जिजाऊ जय शिवराय च्या घोषणा देऊन जलौष करण्यात आला.



## रुग्णांची परिस्थिती पाहुण माफक दरात सेवा द्यावी - डॉ. सुरेश साबळे

माजलगाव : प्रतिनिधी

दि.११.०२.२०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता तालुक्यातील मोठेवाडी येथील डॉ.शंकर घोडके यांच्या नित्यसेवा हॉस्पिटल व मेडिकल चे उद्घाटन डॉ.सुरेश साबळे यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी बोलताना डॉ.साबळे म्हणाले की पंचक्रोशीतील रुग्णांची आर्थिक परिस्थिती पाहुण त्यांच्यावर उपचार व्हावेत. वेळीच रुग्णांना आवश्यकता असेल तर संदर्भसेवे साठी पुढे पाठवण्यात यावे त्याच प्रमाणे सर्पदंश विंचू चावणे इत्यादी रुग्णांना प्रथमोपचार देऊन रुग्णांची प्रकरणी सुधारुन त्यांना तात्काळ पुढील उपचारासाठी इतरत्र पाठवावे.पुढे बोलताना डॉ.साबळे म्हणाले की डॉक्टरकी हा व्यवसाय म्हणून न पाहता हि एक रुग्णसेवा आहे अशा पध्दतीने या ठिकाणी डॉ.घोडके यांनी रुग्ण सेवा द्यावी आपले चांगले नावलौकिक होईल व तुमच्या कडे लोक फॅमिली डॉक्टर म्हणून पाहु लागतील आणि डॉ.शंकर घोडके यांच्या पाठीशी छ.संभाजीनगर व पुणे येथील मोठ्या रुग्णालयात काम केल्याचा प्रदिर्घ अनुभव असल्यामुळे मोठेवाडी व परिसरातील रुग्णांना याचा निश्चित लाभ होईल असे डॉ.सुरेश साबळे यांनी सांगितले या प्रसंगी डॉ.साबळे यांच्या आव्हानांना प्रतिसाद देऊन २४ तास अविरत रुग्ण सेवा देईल असे मनोगत डॉ.शंकर घोडके यांनी व्यक्त केले.

## धम्म परिषेदेतुन मानवी मन सदृढ होते -डॉ.भदन्त उपगुप्त महाथेरो

अंबाजोगाई / प्रतिनिधी

**ही धम्म परिषद प्रबोधनासाठी असुन मनाला सदृढ करुण चांगल्या कामांना प्रेरणा देणारी आहे. दुर्गुनी माणसाला सद्गुनी करण्यासाठी सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील एका उद्योगपतीने २० एक्कर जमिन विहाराला दिली, अनंतपिंड, बिंबीसार, जेतवन राजे, तसे माणसे आजही असल्याचे दिसुन येते. असे प्रतिपादन अखिल भारतीय भिक्खु संघाचे कार्याध्यक्ष डॉ.भदन्त महाथेरो यांनी केले ते परळी तालुक्यातील चांदापुर येथील आयोजित दहाव्या धम्म परिषदेत बोलत होते. दहाव्या अखिल भारतीय बौध्द धम्म परिषद भदन्त धम्मशिल यांच्या उपस्थीतीत तर माजी न्यायमुर्ती बाबुराव तिडके यांच्या हस्ते पंचरंगी धम्म ध्वजारोहन करुन धम्म परिषदेला सुरुवात झाली. धम्म परिषेदेस अ भा भिक्खु संघाचे कार्याध्यक्ष भदन्त डॉ उपगुप्त महाथेरो, प्रा डॉ.सुरेश वाघमारे, स्वागताध्यक्ष अॅड अनंतराव जगतकर, भदन्त धम्मशील महाथेरो, भदन्त पय्यानंद, भदन्त महाविरो डॉ प्रा सुरेश वाघमारे तर विशेष अतिथी म्हणुन नालंदा आकादमीचे चंद्रशेखर वडमारे, इजि अभिमन्यु चव्हाण, इजि राजु बोबडे, प्रा.डॉ.विनोद जगतकर,प्रा प्रदिप रोडे, त्रिंबक रोडे, आनंद वाघमारे, मिलिंद नरबागे मिलिंद घाडगे, माजी न्या बाबुराव तिडके समाज भुषण केशव कांबळे मंचकराव डोणे प्रा बालाजी जगतकर यांची उपस्थीती होती.**




यावेळी बोलताना भदन्त उपगुप्त महाथेरो म्हणाले की, धम्म मनाची मशागत करते, माणसे जोडते, दगडाला आकार मुर्तीकार आणतो तसे सामान्य माणसाला भिख्खुगण माणसात आणतात. हेमाडपंथी मंदिरे ही बौध्द आहेत. साकेत बुध्दाची, ज्ञानाची, त्यागाची, शिक्षणाची, श्रमनाची भारत भुमी आहे. हे तक्षशीला संस्था भविष्यात धम्मपीठ होईल असा विश्वास भदन्त उपगुप्त महाथेरो यांनी व्यक्त केला. यावेळी प्रा डॉ सुरेश वाघमारे म्हणाले की या देशात मनुवाद, आंबेडकर वाद दोन विचार प्रवाह आहेत. बाबासाहेबांचे विचार मानवमुक्तीचा, विज्ञानवादी बुध्द तत्वज्ञानावर पोसलेला आहे. शोषितांच्या मुक्तीचा, प्रगतीच्या विकासाचा विचार आहे. धम्म विचार ओबीसीनी व आदिवाशीनी निट समजुन घेतला पाहिजे. त्यांनी बुध्दाच्या वाटेने गेल्यास मानवाचे कल्याण होणार आहे.असे मत व्यक्त केले. स्वागताध्यक्ष अॅड. अनंतराव जगतकर म्हणाले, भारतीय संविधान विरोधी काम करणार्यांचे समुळ नष्ट केले पाहिजे. काळ वाईट आहे बॅलेट पेपरने निवडणुका झाल्या पाहिजेत. त्यासाठी आंदोलनाची नितांत गरज आहे. न्याय देणार्या समतावादी लोकांना निवडुन दिले पाहिजे. हे मला धम्म पिठावर सांगण्याची वेळ आली आहे. भदन्त धम्मशील महाथेरो हे आपले विचार मांडताना म्हणाले सिध्दार्थ गौतमाने राजगृह सोडुन अंगावर चिवर, हातात कटोरा घेऊन बाहेर पडले. सर्व वैभव असतानाही त्यांनी लोक कल्याणासाठी पंचेचाळीस वर्ष भ्रमंती करत राहिले. मला जे सुख मिळाले ते सर्वांना मिळावे, सर्वांचे जिवन मंगलमय व कल्याणमय व्हावे, सदगुन निर्माण व्हावे, राजा अशोका प्रमाणे धम्मासाठी आपणही आपली मुले दान केली पाहीजेत असे आवाहन केले. पुढे भदन्त पय्यानंद म्हणाले, आपण धम्म, निष्ठा, विश्वास, श्रध्दा ठेवली तरच धम्म विचार तरेल. धम्म व बुध्द ग्रंथ वाचुन आरहंत पदाला पोहचले पाहिजे. आपली भक्ती, श्रध्दा, निष्ठा व विश्वास पक्का पाहिजे. धन, बीज, बल, इंद्रीय, श्रध्दा, निष्ठा असेल तरच धम्म विचाराची भावना प्रबळ होते. शिलाने, दानाने मन पवित्र होते.

धम्म माणसाला सुखाचा मार्ग दाखवतो. धम्मानेच मानवाचे कल्याण होईल असा विश्वास व्यक्त केला. भदन्त महाविरो म्हणाले, बुध्दाचा धम्म शास्त्रसुध्द असुन विज्ञानावर आधारीत आहे. जो चांगले कर्म करतो तो मणुष्याच्या पोटी जन्माला येतो. जीवनातील संकट नष्ट करण्याचे सामर्थ धम्मात आहे. धम्म-सद धम्म विवेकाला जागरुक करतो. आपण प्राणी मात्रावर प्रेम करावे, माता पित्यांना सांभाळावे, कुशल कर्माणे माणुस माणुस बनतो, मनातील मळ जाऊन मैत्री विकसीत करतो त्यासाठी धम्माच्या विचारावर चालले पाहीजे असे मत व्यक्त केले. दहाव्या धम्म परिषेदेच्या प्रस्ताविकात राजेंद्र घोडके म्हणाले, गेल्या दहा वर्षापासुन चांदापुर येथे धम्म परिषद घेत आहोत. ही धम्म परिषद राजकारणापासुन अलिप्त आहे. धम्म प्रसाराचे काम करत आहे. बुध्द कोणाचा द्वेश करित नाही. माणुस म्हणुन सर्वांचे कल्याण करण्यासाठी धम्म परिषदाचे आयोजन करण्याचा हा उठाठेव आहे. यावेळी प्रदिप रोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन प्रा. गौतम गायकवाड सचिन रणखांबे यांनीतर ठराव वाचन व आनंद तुपसमुद्रे यांनी केले.धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै. जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, प्रा.गौतम गायकवाड, व्यंकट वाघमारे, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे चंद्रकांत बनसोडे संजय साळवे राज जगतकर प्रा बी एस बनसोडे किशोर इंगळे सुरेखा रोडे आकाश वेडे प्रविन दासुद मुन्ना वाघमारे विनोद रोडे धनंजय जोगदंड सुहासिनी इंगळे दिपक गायकवाड यांनी प्रयत्न केले . चांदापुर येथे १० व्या बौध्द धम्म परीषदे निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमास उजणी, पट्टीवडगाव, जवळगाव, घाटनांदुर, पुस, गीता, नागापुर, बोधेगाव, डाबी परळी व अंबाजोगाई भागातुन उपासकांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## शांतता समितीची बैठक संपन्न



केज / प्रतिनिधी

केज पोलीस ठाण्याच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमीत्त शांतता समिती बैठक संपन्न झाली. केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमीत्त शांतता समिती बैठक आयोजित केली होती. या बैठकीला केज शहरातील व ग्रामीण भागातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटीचे सदस्य, शिवजयंती मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, व्यापारी बांधव, पत्रकार उपस्थित होते.



बीड - राष्ट्रवादी कॉंग्रेस रोजगार व स्वयंरोजगार सेल बीड शहर अध्यक्ष पदी नसरीन बागवान यांची नियुक्ती करण्यात आली,त्याबद्दल शुभेच्छा देताना जिल्हा अध्यक्ष मा. शीतल धोंडरे, जिल्हा कार्याध्यक्ष मा. पूनम वाघमारे, प्रिया डोईफोडे, माजीद कुरेशी, साजिद जागीरदार, अॅडव्होकेट रुपाली गायकवाड व पदाधिकारी उपस्थित होते.

## गढीचे पत्रकार सखाराम पोहिकर यांना मातृशोक

गेवराई ।प्रतिनिधी

सरपंच ग्रामपंचायत विकास समितीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे गेवराई तालुका अध्यक्ष पत्रकार सखाराम पोहिकर यांच्या मातोश्री सत्यभामा तुकाराम पोहिकर यांचे १० फेब्रुवारी २०२४ रोजी पहाटे ४ वाजेच्या सुमारास वयाच्या १०२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा अंतविधी शनिवारी दुपारी १ वाजता ठाकूर निमगाव ता. शेवगाव जि.अहमदनगर येथील समशानभूमीत करण्यात आला. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. याप्रसंगी त्यांचे नातेवाईक व ठाकूर निमगाव येथील ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.पोहिकर कुटुंबियाच्या दु:खात सर्व पत्रकार बांधव सहभागी आहेत.



हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra).
Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com,
epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com